**नि. फौ. ख. क्र.८३/२०१४**

सरकार वि. सिध्देश्वर बरकडे

**नि.क्र.६५**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– अशोक ज्ञानदेव बरकडे ,</u>**

वय– ३८ वर्षे, व्यवसाय–शेती,

रा. लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

घटना २०१३ मध्ये घडली होती. फिर्यादी ही माझी पत्नी आहे. रामचंद्र भाळे माझे सासरे आहेत. मला चाकाटी रस्त्यावर सकाळी १०.०० ते १०.३० वाजता मारहाण केली. तसेच त्याच्या आदल्या दिवशीही मला दुपारी ०२.०० ते ०३.०० वाजता मला आरोपीने मारहाण करण्याचा प्रयत्न केला. मी माझ्या पत्नीला घेवून घरी आलो होतो. घरी आल्यावर सगळे मला हिला कशाला आणली, हिला इथे ठेवायची नाही, हिने आमचेवर केस केली आहे असे म्हणाले. त्यानंतर मला पाठीवर मारहाण केली. त्यानंतर मी माझ्या सासरवाडीत राहायला गेलो. सासरवाडीत मी वर्षभर राहिलो. आरोपींनी माझ्या सास–याला मारहाण केली व माझ्या सास–याच्या गाडीचा चुरा केला. या व्यतिरिक्त काही घडले नाही.

***<u>(साक्षीदार त्याच्या पुर्वीच्या बयानाशी विसंगत साक्ष देत असल्याने सरकारी वकिलांनी उलटतपासात ग्राहय असलेले प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी देण्यात आली.)</u>***

२. हे म्हणणे खरे आहे की, दि.२८/०८/२०१३ रोजी माझे सासरे रात्री १०.०० वाजता जनावरांना वैरण टाकत होते. त्यावेळी माझी पत्नी, सासू व सासरे घरामध्ये जेवण करत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी हे हातात बॅट,

काठया, बरछा घेवून मोटारसायकलवर आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सिध्देश्वर बरकडे याचेविरुध्द केलेली विनयभंगाची केस मागे घे असे म्हणून मला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, स्वाती हिच्या अंगावर सचिन बरकडे याने रॉकेल ओतले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी सासू हिच्या डाव्या डोळयावर विक्रम याने हातातील बॅटने मारहाण केली व तिला ढकलून दिला. हे म्हणणे खरे नाही की, सिध्देश्वर बरकडे याने माझ्या सास–यांच्या तोंडावर, पाठीवर व दोन्ही पायावर बरछाने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, तलवारीसारख्या हत्याराने अजीत बरकडे याने शिवीगाळ व दमदाटी केली तसेच ठार मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपी हे पळून गेले. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझी सासू व सासरे यांना मारहाण झालेमुळे त्यांना दवाखान्यात घेवून गेलो. माझ्या पत्नीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब घेतला. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझे सासू, सासरे व पत्नीला मारहाण केली तरीही मी आरोपींना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.टी. बी. देवकर, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

३. कथीत घटनेच्या पुर्वी आरोपींचा व आमचा वाद झाला होता. पोलीसांनी मला मारहाण केल्याची व माझ्या बहिणीचे बोट मोडल्याची केस घेतली नाही म्हणून माझ्या सास–याने सदरची केस केली आहे. माझ्या सास–याने जी केस केली त्याप्रमाणे घटना घडली नव्हती. माझ्या सास–याने माझ्या पत्नीला केस करायला लावली. या केसमध्ये नमूद केल्याप्रमाणे घटना घडली नव्हती. पुर्वी मला मारहाण केलेली घटना वेगळीच आहे. कथीत घटना घडली होती त्यावेळी मी धानोरा येथे गेलो होतो. घटनास्थळावर हजर नव्हतो. मी १२ ते १२.३० वाजता धानोरा येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे घर आमचे शेतात येते असे आमचे मत आहे. आमचे घर हे लाखेवाडी गट नं.६५५/१ मध्ये येते. माझे चुलते विठ्ठल बरकडे यांचे गट नं.६५५/१ मध्ये नाव होते. आरोपींचे व आमचे शेतावरून वाद होते. या केसच्या पुर्वी माझ्या पत्नीने आरोपींचेविरुध्द विनयभंगाची केस केली होती. त्या केसचा निकाल लागला आहे. मी पोलीसांना जबाब

देताना मला आरोपींनी चाकाटी रस्त्यावर सकाळी १०.०० ते १०.३० वाजता मारहाण केली असे सांगितले होते तसेच त्याच्या आदल्या दिवशीही मला दुपारी ०२.०० ते ०३.०० वाजता मला आरोपीने मारहाण करण्याचा प्रयत्न केला हेही सांगितले होते. परंतू ते माझ्या जबाबात का नमूद केले नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. मी धानोराला गेल्यामुळे मला दि.२८/०७/२०१३ रोजी काय घडले हे माहीत नव्हते. विक्रमला माझ्या सासुने लाकूड फेकून मारले याची केस प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे ही खोटी केस केली आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/-
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.११/०७/२०२५**

**नि. फौ. ख. क्र.८३/२०१४**

सरकार वि. सिध्देश्वर बरकडे

**नि.क्र.६६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

**<u>माझे नाव– राजेंद्र सोनबा चव्हाण ,</u>**

वय– ४६ वर्षे, व्यवसाय– सहा. पो. उप.,

रा. राजगड पोलीस स्टेशन, नसरापूर, ता.भोर, जि.पुणे.

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. पी. लोहकरे, यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

दि.३०/०८/२०१३ रोजी मी बावडा दुरक्षेत्र येथे कार्यरत होतो. दि.३०/०८/२०१३ रोजी गु. र. नं.२८०/२०१३ नोंद झाला होता. त्याचा तपास माझेकडे तोंडी आदेशाने दिला. तपासादरम्यान मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.६७</u>** देण्यात येते. मी साक्षीदारांचे तपास टिपणे नोंदविली. अशोक बरकडे याचे तपास टिपण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. दि.०५/०९/२०१३ रोजी आरोपींना अटक केली. दि.०८/०९/२०१३ रोजी फिर्यादीने गुन्हयात वापरलेली बॅट हजर केली. ती पंचांसमक्ष जप्त केली. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. तो तोच आहे. त्यावर माझी व पंचांच्या सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.६८</u>** देण्यात येते. त्यानंतर मुद्देमाल पावती फाडून मुद्देमाल जमा केला. आता मला सदर मुद्देमाल पावती दाखविली. ती तीच आहे. तीस **<u>नि.क्र.६९</u>** देण्यात येते. फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे घटना घडल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.टी. बी. देवकर, विधीज्ञ यांचेमार्फत –</u>**

२. फिर्यादीच्या शेजारी घरे आहेत. शेजारच्या लोकांकडे चौकशी केली नाही. घटनास्थळाशेजारी बावडा वालचंदनगर रस्ता आहे. घटनास्थळाशेजारील रस्त्यावर नेहमी वर्दळ असते. गुन्हयातील बॅट ही फिर्यादीनेच आणून दिली. फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये जमीनीवरून वाद आहेत का कसे मला माहिती नाही. आरोपींनीही फिर्यादीविरुध्द गुन्हा दाखल केला होता का कसे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये लिहिला व त्या ठिकाणी पंचांच्या सहया घेतल्या. बॅटचा पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचांना पंचनाम्यातील माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशोक बरकडे यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचा जबाब घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, कथीत गुन्हयाच्या वेळी अशोक हा गावात नव्हता असे तपासात निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा पंचांसमक्ष केला व त्यावर पंचांच्या सहया घेतल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा नसताना फिर्यादीच्या दबावात खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.११/०७/२०२५**